**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन श्रीपाद घाटपांडे
मु.पा.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एच.आर.गरीबे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.ए.भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निकाल दिलेला नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीकर्ता श्री.मोहन श्रीपाद घाटपांडे यांनी मोघम स्वरूपात माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे यांनी त्यांना तसे कळवून नेमक्या माहितीची मागणी करण्यास सांगितले होते. तसेच माहितीचा अधिकार व विविध स्वरूपाच्या तक्रारी याबाबतचे अर्ज, निवेदने यांची सरमिसळ करून अर्ज केले. तसेच काही संदर्भात न्यायालयीन प्रकरणामुळे व न्यायालयाच्या मनाई हुकूमामुळे माहिती देणे शक्य नव्हते. सुमारे तीस वर्षांपूर्वीची माहिती श्री.घाटपांडे यांनी मागितली असून त्यांचा मूळ अर्ज दप्तरी नव्हता. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी तो प्राप्त करून घेऊन दोन दिवसात देय माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.ए.भोसले यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव शामराव नालंदे
कराभिमा टाईम्स, व्हील कॉलनी, बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मॅनेजर, बारामती तालुका
सहकारी खरेदी विक्री संघ लि., बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२१ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ प्रतिनिधी श्री.अ.अ.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा मॅनेजर, बारामती तालुका
सहकारी खरेदी विक्री संघ लि., बारामती, जि.पुणे श्री.मारूती बापूराव तावरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, या कारणावरून बारामती तालुका खरेदी विक्री संघ मर्यादित, बारामती यांनी माहिती नाकारली. त्याविरूध्द अपीलकर्ता श्री.नामदेव शामराव नालंदे यांनी दोन अपील अर्ज अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे केले. संस्थेचे उत्तर योग्य असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी श्री.नालंदे यांची अपिले फेटाळली, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे. तसेच संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसला तरी त्यांनी संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर साहेबराव सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, दौंड तालुका सहकारी
देखरेख संघ मर्यादित, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, दौंड, जि.पुणे श्री.बाळासाहेब मुरलीधर तावरे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, दौंड तालुका सहकारी
देखरेख संघ मर्यादित, दौंड, ता.दौंड, जि.पुणे श्री.गणपत भगवंतराव हिंगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासकीय अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे दौंड तालुका सहकारी देखरेख संघ मर्यादित, ता.दौंड, जि.पुणे यांचे सचिव श्री.एन.जी.जेधे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दौंड, जि.पुणे श्री.बाळासाहेब मुरलीधर तावरे यांनी केले. या अर्जात मागितलेली माहितीच श्री.सोनवणे यांनी पुणे जिल्हा देखरेख संघाकडे मागितली होती. ती मिळाल्याचे श्री.सोनवणे यांनी लेखी दिले असून आयोगाने यापूर्वी ते अपील (अ.क्र.१७९३) निकाली काढले आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा देखरेख संघ, पुणे जिल्हा श्री.गणपत भगवंतराव हिंगे यांनी नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.३.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सदाशिव सखाराम पोवार
रा.२६५१ डी, डांगेगल्ली,
कोल्हापूर-४१६००२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त,**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
नगर रचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४६/२००९/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४/०८/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२/०९/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/१०/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सि.स.नं.१२४४ (अ) १५ दुधाळी कोल्हापूर या भूखंडाबाबतची माहिती व नकलांच्या प्रती | |

## विवेचन

श्री. सदाशिव सखाराम पोवार, यांनी १२४४ (अ) १५, दुधाळी, कोल्हापूर या भूखंडाबाबत यापूर्वी आयोगाकडे ५५६,५५७ व १४८/२००९/कोल्हापूर आणि ४४४/२००९ /कोल्हापूर अन्वये अपिले दाखल केली आहेत. सदर अपिलांवर प्रत्यक्ष सुनावणी घेऊन, तसेच दोन्ही बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे विचारात घेऊन दि.१५/१२/२००९, १६/१२/२००९ व २१/१२/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. सदर अपील देखील त्याच विषयाबाबतचे आहे. ही बाब विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गणेश मुरलीधर कांबळे
अे ४०/०९, अप्पर ओटास्किम, इंदिरानगर,
बिबवेवाडी, पुणे-३७

**अपीलकर्ता**

विरुध्द

१) **जन माहिती अधिकारी,**
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई-३२

२) **जन माहिती अधिकारी,**
आरोग्य सेवा पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,
४ था मजला, पुणे-१

३) **जन माहिती अधिकारी,**
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद पुणे

४) **जन माहिती अधिकारी,**
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुणे जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी / जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या बदल्यांसंदर्भात | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गणेश मुरलीधर कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केले आहे. अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये आवश्यक

असल्याप्रमाणे अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब श्री.कांबळे यांच्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माणिक आनंदा चौगुले
जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब
तहसीलदार, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माणिक आनंदा चौगुले
जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.पी.आर.कोथेरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब
तहसीलदार, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर
१. प्रतिनिधी श्री.डी.आर.सावंत २.श्री.एस.बी.निकम

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००९ व १६.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.२.२००९ व १४.१.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. - | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्थेकडून आपण कर्ज घेतलेले नसताना व जमीन तारण दिलेली नसताना आपल्या ७/१२ पत्रकी केलेल्या नोंदीबाबतची माहिती आपण मागूनही मिळाली नाही. मंडल अधिकारी हे जन माहिती अधिकारी नसल्याचे व निवासी नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी असल्याचे तीस दिवसांनी आपल्याला कळविले. निवासी नायब तहसीलदार यांनी १०४ पाने माहिती दिली. परंतु नोटिशीची प्रत दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.माणिक आनंदा चौगुले यांनी केली.

बनावट दस्त तयार करून जमिनीवर बोजा नोंद केली असल्यामुळे मंडल अधिकारी, निवासी नायब तहसीलदार व तहसीलदार यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंदवावा, अशी मागणी श्री.चौगुले यांनी केली.

श्री.चौगुले यांनी केलेल्या अर्जानुसार विहित मुदतीत त्यांना माहिती देण्यात आली. त्यांनी शेतीसाठी कर्ज काढले आहे व त्याची तारण नोंद घेण्यात आली आहे. मूळ अर्जात त्यांनी कायदेशीर कारवाईची मागणी केली असून गावकामगार तलाठी व मंडल अधिकारी यांना नोंदी करण्याचा अधिकार काय, अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. सहकार न्यायालयातही या संदर्भातील मूळ प्रकरणातील दावा दाखल होता, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.डी.आर.सावंत यांनी नमूद केले.

कर्ज घेतलेले नसताना व जमीन तारण गहाण ठेवलेली नसताना नोंदी केल्याची अपीलकर्त्याची मुख्य मागणी आहे. त्याबाबतची कार्यवाही हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विषय नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. बोजाची नोंद कशाच्या आधारे केली, याची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित जप्ती आदेशाची प्रत अपीलकर्त्यास देणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) तारण नोंद घेण्याच्या संदर्भातील तपशील जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास दि.२५.३.२०१० पर्यंत पुरवावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.के.जी.सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत),
जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत),
जिल्हा परिषद, पुणे श्री.एम.एस.घुले

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद, पुणे श्री.एस.सी.लिमजे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.११.२००८ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती देण्यात आली असून त्यांची तक्रार राहिलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, पुणे श्री. एस. सी. लिमजे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, पुणे श्री.एम.एस.घुले यांनी श्री.सोनवणे यांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलवार निवेदनासह केले. अपील निकाली काढण्याबाबत उभय घटकांचे एकमत झाल्याबाबत श्री.सोनवणे यांनी स्वाक्षरीसह नमूद केले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भगवान नामदेव पाटील
१७४/१८०, कुसुम विजय हाऊस,
दुसरा माळा, रुम नं.६, मोदी स्ट्रीट, फोर्ट,
मुंबई-४००००१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
तालुका न्यायालय शाहुवाडी,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६९/२००९/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दिवानी न्यायालयाने दि. ५/७/२००० रोजी टेनन्सी केस नं.१/८० प्रकरणी दिलेल्या निकालाची मूळ प्रत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भगवान नामदेव पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी याचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे तसेच आवश्यक शुल्क (रु.२०/-चे मुद्रांक/पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 29 MAR 2010

**(विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. लहुदास बाबु पवार
मु.पो. उळेवाडी, ता. दक्षिण सोलापूर,
जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर,
जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,** **उत्तरवादी**
ग्रामपंचायत उळेवाडी, ता. दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७४/२००९/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>ग्रामपंचायत उळेवाडी, ता.दक्षिण सोलापूर,ला दि. २०/११/२००८ ते दि. २/४/२००९ या कालावधीत किती निधी मिळाला, तो कोठे खर्च झाला, या कालावधीत आतापर्यंत ग्रामपंचायतीच्या बँक खात्यावर जमा झालेल्या घरपट्ट्या | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. लहुदास बाबु पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. फरलाल फल्लू पवार — अपीलकर्ता
मु.पो. कोमरे, पो. उत्तमनगर,
ता. हवेली, जि. २३.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली
शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली, शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७५ + १९७६ + १९७७ + २०८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. फरलाल फल्लू पवार
मु.पो. कोमरे, पो. उत्तमनगर, ता. हवेली, जि. २३.

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली
शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली, शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १९७५ + १९७६ + १९७७ + २०८७ / पुणे | १५.२.२००८ | १५.३.२००८ | २८.३.२००८ | १९.४.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

वारंवार मागणी करूनही मौजे धनकवडी, पुणे येथील इनाम जमिनीसंदर्भातील माहिती आपल्याला दिली जात नाही. सन १९५६ च्या कबुलायत पत्राने जमीन आपल्याला मिळाली. सन १९५९ पर्यंत आपल्या पूर्वजांनी ती कसली. ऑगस्ट १९५९ मध्ये इनाम खालसा झाले. नवीन शर्तीने जमीन परत देण्याबाबत जानेवार १९६३ मध्ये हुकूमनामा झाला. या मिळकतीचे पूर्वीचे इनामदार (जमीनधारक) श्री. कंठ्या तोत्या पवार यांचे काही वारसदार, ज्ञानेश्वर को.ऑप. हौसिंग सोसायटी आणि शासन यांच्यात गैरव्यवहार झाले असल्याची शंका असून त्यामुळे कागदपत्रांच्या प्रती दिल्या जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. फरलाल फल्लू पवार यांनी केली.

श्री. पवार मागणी करतात त्याप्रमाणे कागदपत्रे अभिलेखात नाहीत. संबंधित जमीन वारसा हक्काने आपल्या मालकीची असल्याचा त्यांचा दावा आहे. परंतु कागदपत्रावरून तसे आढळत नाही व त्या संबंधीची सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. तसेच मूळ धारिकाही अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश निबांळकर यांनी केले. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशानुसार संबंधित जमीन ज्ञानेश्वर को. ऑप. हौसिंग सोसायटीला दिल्याचे नमूद आहे, असेही त्यांनी सांगितले. या आदेशाची प्रत उपरोक्त हौसिंग सोसायटीकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. जमिनीच्या मालकीबाबतचा अपीलकर्त्याचा दावा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन मल्हारी राजगुरु
मु.पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे-४११ ००८ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी खेड,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.मोहन मल्हारी राजगुरु<br>मु.पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक,<br>पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे-४११ ००८ श्री.रामनाथ पोकळे<br>**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी खेड,<br>ता.खेड, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.०४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.०४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.०५.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला खोली खाली करुन देण्यास सांगितल्याबाबत तक्रारीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी,खेड यांच्या कार्यालयात गेलो असता, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्यावर

दबाव आणला. तक्रारीबाबतच्या जाब जबाच्या व अन्य कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत. तसेच आपली तक्रारही दाखल करुन घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मोहन मल्हारी राजगुरु यांनी केली.

श्री.राजगुरु यांची व्यक्तिगत विषयाची तक्रार असून विहित मुदतीत त्यांना माहिती देण्यात आली. त्यांच्या मूळ अर्जानुसार कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या, तथापि मूळ तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांचा लेखी जबाब घेतला नसल्यामुळे तसे त्यांना लेखी देण्यात आले असून त्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आली. त्यानंतर श्री.राजगुरु यांनी 'माहिती मिळाली असून तक्रार राहिली नसल्याचे' लेखी दिलेले आहे. दि.१८.०७.२००५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड यांच्या कार्यालयात समक्ष आपले लेखी म्हणणे घेण्यात आले असल्याचे श्री.राजगुरु यांचे म्हणणे असून त्यांना आवश्यक वाटल्यास संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांनी तक्रार द्यावी, असेही त्यांना सांगण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य.
२. अपीलकर्त्यांची मुख्य तक्रार पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीबाबची असून ही बाब माहितीचा अधिकारी अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. दि.१८.०७.२००५ रोजी अपीलकर्त्याचा लेखी जबाब घेतल्याच्या प्रतिपादनाबाबत तपासणी करुन अभिलेखानुसार असलेल्या कागदपत्रांच्या प्रती व मूळ तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

स्थळ : पुणे
दिनांक : 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश उध्दव फासे
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, शासकीय निवासस्थान,
लाईन नं.५, रू.नं.५१, कळंबा, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
बावडा, ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
बावडा, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०० / कोल्हापूर /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती प्राप्त झाली असून अपील निकाली काढण्यात यावे असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.गणेश उध्दव फासे यांनी दि.१२.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७ .३.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले
रा.राहूल चेबंर्स, १४, एरंडवणे,
कर्वे रोड, पुणे-४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, उत्तरवादी
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तालूका निरीक्षक,
भूमि अभिलेख, भूमि अभिलेख कार्यालय, हवेली,
ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, पुणे
श्री. बाळासाहेब वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालूका निरीक्षक,
भूमि अभिलेख, भूमि अभिलेख कार्यालय, हवेली,
ता. हवेली, जि. पुणे श्री. अनिल दत्तात्रय माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले यांनी अन्य व्यक्तींच्या संदर्भातील न्यायालयीन कागदपत्रांची मागणी केली होती. परंतु त्यासाठी आवश्यक तो तपशील दिला नव्हता. तसे कळविल्यानंतरही त्यांच्याकडून तपशील न मिळाल्याने माहिती देता आली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडे त्यांनी अपील केले व त्यासोबत मूळ व्यक्तीच्या अर्जाची प्रत जोडली. त्या आधारे पंधरा दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे श्री. बाळासाहेब वानखेडे यांनी दिले. संबंधित प्रकरण सन २००० मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले असल्याच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास दिली व अपिलाच्या निर्णयानंतर माहिती दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पुणे श्री. प्रभाकर मुसळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे श्री. बाळासाहेब वानखेडे यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य, यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दत्तात्रय कोंडाजी काळे
मु.पो. चास, (कमान) ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, ता. खेड, जि. पुणे — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दत्तात्रय कोंडाजी काळे
मु.पो. चास, (कमान) ता. खेड, जि. पुणे

**तत्कालिन अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. एस. डी. मुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. २५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.३.२०१० रोजी आयोगापुढे सुनावणी घेण्यात आली.

आपल्या घराशेजारील इमारतीचा दुसरा मजला मोडकळीस आला असून त्यामुळे आपल्या कुटुंबाच्या जीवितास धोका होण्याचा संभव असल्याने मोडकळीस आलेला भाग उतरवून घ्यावा, असा अर्ज आपण ग्रामपंचायतीकडे व तहसीलदारांकडे केला. परंतु खाजगी इमारतीबाबत आपल्याला कार्यवाही करता येणार नाही, असे त्यांनी सांगितले. कार्यवाही केली जात नाही व माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तात्रय कोंडाजी काळे यांनी केली.

अपीलकर्ता व त्यांचे शेजारी यांच्यातील हा खाजगी स्वरूपाचा विषय असून त्या संदर्भातील ग्रामपंचायतीचा ठराव आदी सर्व माहिती श्री. काळे यांना देण्यात आली. त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड श्री. के.बी.नेहरे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त असल्याचे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संदीप चंद्रकांत मांडवेकर
४०३/४०४, एकनाथ गृहरचना संस्था मर्यादित,
शुक्रवार पेठ, पुणे -२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
एकनाथ गृहरचना संस्था मर्यादित,
४०३/४०४, शुक्रवार पेठ, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२६/२००९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०५/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०६/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८/११/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** एकनाथ गृहरचना संस्था मर्यादित, पुणे मधील फ्लॅट संख्या, सभासद संख्या, प्रत्यक्ष भोगवटाधारक तदनुषंगीक ५ मुद्दे | |

**विवेचन**

भरीव शासकीय मदत/अनुदान नसलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.